सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
॥ यः क्रियावान् स पण्डितः ॥

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

# वित्त व लेखा विभाग

## अंतर्गत परिपत्रक

**विषय :** वैद्यकीय विमा पॉलिसीमध्ये सेवकांच्या नातेवाईकांचा जन्मदिनांक अद्ययावत करणेबाबत.

विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेतर सेवकांसाठी सामुहिक वैद्यकीय विमा योजना आणि सामुहिक वैयक्तिक अपघात योजना व त्यांच्या नातेवाईकांसाठी सामुहिक वैद्यकीय विमा योजना दि. ११ नोव्हेंबर, २००४ पासून राबविण्यात येत आहे. सदर पॉलिसी ही Floater Policy या प्रकारची आहे. सेवक व सेवकांचे नातेवाईक मिळून विम्याची सध्याची कमाल मर्यादा रुपये ३ लाख आहे.

विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार २० व्या वर्षी (दि. ११/११/२०२३ ते १०/११/२०२४) विमा पॉलिसीचे दि ओरिएण्टल इन्शुरन्स कंपनीकडे नूतनीकरण करण्यात आलेले आहे. सदर विमा पॉलिसीच्या बाबतीत मेडीक्लेम कार्ड देण्यासाठी विमा कंपनीने सेवक व त्यांचे नातेवाईक यांचा जन्मदिनांक आवश्यक असल्याचे कळविले आहे.

या परिपत्रकाव्दारे सर्व संबंधित शिक्षक व शिक्षकेतर सेवकांना कळविण्यात येते की, त्यांनी विद्यापीठाच्या Human Resource Management System मधील For Employee User मध्ये Login करून Services मधील Employee Mediclaim Scheme या वर क्लिक करून Online पध्दतीने त्यांचे नातेवाईकांच्या जन्मदिनांक भरावयाच्या आहेत. सदर जन्मदिनांक भरण्यासंबंधीच्या सूचना Employee Mediclaim Scheme यामध्ये दिलेल्या आहेत.

जे सेवक सदर माहिती अद्ययावत करून त्याची प्रत देयक कक्ष, वित्त व लेखा विभाग येथे दि.२९.०२.२०२४ पर्यत जमा करणार नाहीत त्या सेवकांचे विमा पॉलिसीचे कार्ड इन्शुरन्स कंपनीकडून प्राप्त होणार नाहीत. यामुळे वैद्यकीय सेवा घेताना काही अडचण निर्माण झाल्यास याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित सेवकाची असेल, कृपया याची नोंद घ्यावी.

(सीएमए चारूशीला गायके)
वित्त व लेखा अधिकारी

गणेशखिंड, पुणे - ४११००७.
जा. क्र. वित्त/२०२३-२४/११२१
दिनांक : १६ फेब्रुवारी, २०२४

**प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी :**

१. मा. संचालक, सर्व प्रशाला, )
२. मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग, )
३. मा. शाखाप्रमुख, सर्व प्रशासकीय शाखा, )
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ )

यांना विनंती की, आपल्या विभागामधील शिक्षक व शिक्षकेतर सेवकांच्या निदर्शनास प्राधान्याने सदरचे परिपत्रक आणावे.